**प्रेसनोट** दि.१३.०३.२०१९

**शिर्षक - महानगरपालिकेच्या टॅक्स पावतीवर तक्रारदार यांचे नाव लावण्यासाठी लाचेची मागणी करून स्विकारणारे प्रकाश मरेड्डी, कर निरीक्षक, कर आकारणी विभाग शहर हद्दवाड सो.म.प.विभाग यांना रंगेहात पकडले.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | सदर बझार पोलीस स्टेशन सोलापूर शहर, गुरनं /२०१९ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | श्री. प्रकाश स्वामी मरेड्डी, वय ५४ वर्षे, कर निरीक्षक, शहर हद्दवाड विभाग, सोलापूर महानगरपालिका, रा. ६७, भूषण नगर, वांगी रोड, डॉ.होळीकट्टी दवाखाना जवळ, सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १५००/- रूपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १५००/- रूपये. |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांनी त्यांच्या स्वतःच्या नावे नवीन प्लॅट खरेदी केलेला असून त्याचे खरेदीखत केलेले आहे. यामुळे सदर प्लॉटचे महारनगरपालिका सोलापूर यांचेकडील कर पावतीस तक्रारदार यांचे नाव लावण्यासाठी त्यांनी महानरगपालिकेच्या शहर हद्दवाडी विभागाचे कर आकारणी विभागात अर्ज केला होता. त्यावरून कर पावतीस तक्रारदार यांचे नाव लावण्यासाठी यातील प्रकाश मरेड्डी, कर निरीक्षक हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कडे तक्रार दिली होती.<br>त्यावरून सदर तक्रारीची दि.१३.०३.२०१३ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांच्याकडून पडताळणी करण्यात आली होती. त्यामध्ये तक्रारदार यांचेकडे कर निरीक्षक श्री.प्रकाश मरेड्डी यांनी कर पावतीस नाव लावण्यासाठी देण्यासाठी १५००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले होते. त्यावरून दि.१३.०३.२०१९ रोजी मरेड्डी यांच्या विरूध्द सोलापूर महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागात लाचेचा सापळा लावला असता तक्रारदार यांचेकडून १५००/- रूपये लाच स्विकारल्यानंतर श्री.प्रकाश मरेड्डी यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. यातील श्री. प्रकाश स्वामी मरेड्डी, वय ५४ वर्षे, कर निरीक्षक, शहर हद्दवाड विभाग, सोलापूर महानगरपालिका, रा. ६७, भूषण नगर, वांगी रोड, डॉ.होळीकट्टी दवाखाना जवळ, सोलापूर यांच्या विरूध्द सदर बझार स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| **विशेष बाब** | |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.शी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | पोलीस उपअधिक्षक,अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर ४१३४०३. |
| संकेत स्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | acbwebmail@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार अ‍ॅप | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२१७-२३१२६६८ |
| व्हॉटसअ‍ॅप क्रमांक | :- | ९९३०९९७७०० |

**(अरूण देवकर)**
**पोलीस उपअधिक्षक**
**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो. सोलापूर.**

Scanned with CamScanner